IIP: WJHSS
IIP World Journal of Humanities and Social Sciences

**An Online Peer-Reviewed / Refereed Journal**
Vol: 01 No. Issue IV, (October-December) (2025)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# बदलतं शिक्षण आणि ज्ञानरचनावाद

**प्रा. निशांत राजेंद्रकुमार गोंधळी**
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे

**Article Info**

***Article History:***
Received: 15th Dec 2025
Accepted: 18th Dec 2025
Published: 20th Dec 2025

***Keywords:***

*शिक्षण*
*ज्ञानरचनावाद*

**ABSTRACT**

शिक्षण कशासाठी, असा प्रश्न जर मनात डोकावला तर त्याचे सोपे उत्तर आहे जीवनासाठी. भविष्यकाळ सुकर करण्यासाठी लागणाऱ्या क्षमता जर शिक्षण पुरे करू शकत नसेल तर शिक्षण व्यर्थ आहे. जीवनाशी जोडणारे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक मुलामध्ये उपजत शिकण्याची आवड असते. जर शाळांनी ती जोपासली तर मुले सरसर शिकतात. आनंदाने नव्या गोष्टी आत्मसात करतात. काळानुरूप शिक्षण पद्धतीत क्रांती झालेली आहे. वर्तनवादातून रचनावादाकडे शिक्षणाची वाटचाल जोरात सुरू आहेच. नव्या धोरणांतर्गत शिक्षणात महत्त्वाचे बदल झालेले आहेत. शिक्षणाचे उद्दिष्ट बदललेले आहे. शिक्षणाचा आशयदेखील बदलला आहे आणि यामुळे अर्थातच अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन नक्कीच बदललेले आहे. म्हणून शिक्षकाची भूमिका व मानसिकता जुनी राहून चालणार नाही. शिक्षण दोन माध्यमांतून होत असते. एक शाळा तर दुसरे समाज संस्कृतीतून मूल खूप काही शिकते. तंत्रविज्ञान, विज्ञान, भाषा यात होणाऱ्या प्रगतीमुळे नव्या गरजा निर्माण होतात व त्यामुळे शिक्षणदेखील बदलावे लागते.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: Dec 17, 2025
Similarity Index: 7%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2025 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite:** Gondhali, N. R. (2025). *बदलतं शिक्षण आणि ज्ञानरचनावाद*. IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS), 1(IV), **727–731**.

**प्रस्तावना:**

शिक्षण कशासाठी, असा प्रश्न जर मनात डोकावला तर त्याचे सोपे उत्तर आहे जीवनासाठी. भविष्यकाळ सुकर करण्यासाठी लागणाऱ्या क्षमता जर शिक्षण पुरे करू शकत नसेल तर शिक्षण व्यर्थ आहे. जीवनाशी जोडणारे शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक मुलामध्ये उपजत शिकण्याची आवड असते. जर शाळांनी ती जोपासली तर मुले सरसर शिकतात. आनंदाने नव्या गोष्टी आत्मसात करतात. काळानुरूप शिक्षण पद्धतीत क्रांती झालेली आहे. वर्तनवादातून रचनावादाकडे शिक्षणाची वाटचाल जोरात सुरू आहेच. नव्या धोरणांतर्गत शिक्षणात महत्त्वाचे बदल झालेले आहेत. शिक्षणाचे उद्दिष्ट बदललेले आहे. शिक्षणाचा आशयदेखील बदलला आहे आणि यामुळे अर्थातच अध्ययन-अध्यापन व मूल्यमापन नक्कीच बदललेले आहे. म्हणून शिक्षकाची भूमिका व मानसिकता जुनी राहून चालणार नाही. शिक्षण दोन माध्यमांतून होत असते. एक शाळा तर दुसरे समाज संस्कृतीतून मूल खूप काही शिकते. तंत्रविज्ञान, विज्ञान, भाषा यात होणाऱ्या प्रगतीमुळे नव्या गरजा निर्माण होतात व त्यामुळे शिक्षणदेखील बदलावे लागते.[१]

अध्ययन म्हणजे व्यक्ती वर्तनात कायमस्वरूपी बदल होय. अध्ययन ही नैसर्गिक प्रक्रिया असून मूल दैनंदिन जीवनातून अनौपचारिकपणे सतत शिकत असते. चौकशी करणे, प्रश्न विचारणे, संशोधन करणे हा मुलांचा नैसर्गिक स्वभाव आहे. त्यातूनच विद्यार्थी ज्ञान मिळवत असतात. तर शाळेतदेखील विद्यार्थ्यांना स्वतःबद्दल, इतरांबद्दल व समाजाबद्दल जाणून घेण्याच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात. अशाप्रकारे विविध माध्यमातून विद्यार्थी सतत ज्ञान मिळवित असतो. यातूनच अध्ययन अध्यापनाबाबत अनेक विचार प्रवाह विकसित झालेले दिसतात. ज्ञानरचनावाद हा त्यापैकीच एक विचारप्रवाह होय. प्रभावी अध्ययन-अध्यापनासाठी ज्ञानरचनावादी पद्धती उपयुक्त ठरत असल्यामुळे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ मध्ये ज्ञानरचनावादाचा पुरस्कार केलेला आहे.

**'ज्ञानरचनावाद' अर्थ व स्वरूप :**

ज्ञान म्हणजे ज्याद्वारे अर्थनिर्मिती होते व आपण राहत असलेले जग समजून घेण्यासाठी मदत होते, भाषेद्वारे विचारांच्या पद्धती व संकल्पनांच्या, रचनांच्या स्वरूपात संघटित केलेला अनुभव म्हणजे ज्ञान होय. ज्ञान म्हणजे विविध कृती/पद्धती, उपक्रम किंवा विचारांबरोबरच शारीरिक कौशल्ये, जगातील क्रियांमध्ये सहभाग, नवनिर्मिती व वस्तू घडवणे असे देखील म्हणता येईल.[२]
ज्ञानरचनावाद हा तीन पातळीवर आपल्याला भेटतो.

१. तत्त्वज्ञान
२. शिक्षणविषयक विचारसरणी
३. शिक्षणपद्धती

ज्ञानरचनावाद हे 'ज्ञाननिर्मितीशास्त्रा'तील (Epistemology) एक तत्त्व आहे; तत्त्वज्ञान आहे. माणसाला निसर्गत:च आकलनाची (knowing) क्षमता प्राप्त झाली आहे. ही क्षमता माणसाला जनुकांतून (Genes) मिळते. माहिती (Information) ही हजारो वर्षे, संस्कृतीच्या विकासात साठत गेली आहे. ही माहिती माणसाला मनुकांतून (Memes) मिळते. मनुके ही जनुकांप्रमाणेच हजारो वर्षांच्या उत्क्रांतीतून निर्माण होतात; आणि एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे पोहोचवली जातात. मनुके हा शारीरिक जनुकांचा सांस्कृतिक सखा आहे. शिक्षणव्यवहारात ज्ञानरचनावाद हा ज्ञाननिर्मितीची प्रक्रिया पायाभूत मानतो. म्हणजे जनुके ही नैसर्गिक माहिती देतात, तर मनुके ही सांस्कृतिक माहिती देतात. ज्ञाननिर्मितीसाठी काहीतरी प्रक्रिया घडून ह्या दोन्हींचा संयोग व्हावा लागतो. जनुकांतील माहिती (आकलनक्षमता) ही जशी मेंदूतील पेशींमध्ये साठवलेली असते, तशीच मनुकांमधील माहितीसुध्दा पेशींमध्ये साठवलेली असते. त्यामुळे ह्या दोन्हींच्या संयोगाची प्रक्रिया ही मेंदूमधील किंवा मानसपातळीवरील प्रक्रिया असते.[३] विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्विस मानसशास्त्रज्ञ व शिक्षणशास्त्रवेत्त झां प्याजे व रशियन मानसशास्त्रज्ञ लेव्ह सेमेनोव्हिच व्योगोट्स्की यांनी मुलांवर प्रयोग केले. तेव्हा त्यांना असे दिसून आले की, मुलेच स्वप्रयत्नांतून ज्ञाननिर्मिती करतात. हा विचार बोधात्मक मानसशास्त्रज्ञांनी उचलून धरला आणि त्याचा विस्तार ज्ञानरचनावादात झाला. मुले सभोवतालच्या जगाचा अर्थ कसा लावतात, हे जाणून घेण्यासाठी प्याजे यांनी मांडलेली 'बोधात्मक विकासाची उपपत्ती' अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्याचबरोबर लेव्ह यांनी मुलाचा विकास कसा होतो, हे अभ्यासताना 'मुलांच्या विकासात विचारप्रक्रिया आणि भाषा यांचा फार मोठा वाटा असतो', याची नोंद घेतली. त्याच बरोबर अमेरिकन शिक्षणतज्ज्ञ जेरॉम ब्रुनर यांनी आपल्या 'शिक्षणाची प्रक्रिया' या पुस्तकात संकल्पनेचे विचारप्रक्रियेतील आणि पर्यायाने शिक्षणातील महत्त्व सांगितले आहे.[४]

ज्ञानरचनावाद ही शिकण्याची स्वाभाविक पद्धती असून बदलत्या काळात आव्हानांना सामोरे जाणारा स्वयंसिद्ध नागरिक बनण्याच्या गरजेतून त्याकडे पाहणे क्रमप्राप्त बनले आहे. 'तपशीलापासून तयार होणारे संबोध हे नंतर येणारा अपरिचित संबोध समजून घेण्यास, त्याचे विश्लेषण करण्यास, एखाद्या निर्मितीचे मूल्यमापन करण्यास व स्वतः नवनिर्मिती करण्यास कारणीभूत ठरतात.' जेरॉम ब्रुनर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १९६० च्या दशकात अमेरिकेच्या शालेय अभ्यासक्रमात या संबोधाधारित पुनर्रचनेचा आग्रह धरला. तो त्या देशाच्या प्रगतीला कारणीभूत ठरला. पाश्चात्यांचे अनुकरण म्हणून नव्हे; तर जे योग्य नि चांगले आहे ते घ्यावेच म्हणून शिकण्याची स्वाभाविक पद्धती म्हणून आणि सद्यस्थितीत काळाची गरज म्हणून वर्ग अध्यापनात ज्ञानरचनावाद अपरिहार्य बनला आहे. शिक्षकांना योग्य माहिती आणि दिशा देऊन ज्ञानरचनावादी अध्यापक बनण्यास प्रवृत्त करून शिक्षकांनीही त्यानुसार सकारात्मक दृष्टी ठेवून प्रयत्न केल्यास हळूहळू कौशल्य येत जाऊन अध्ययनानंद आणि अध्यापनानंद या दोन्ही गोष्टी साध्य होऊ शकतात हे नक्की.[५]

**आनंददायी शिक्षणासाठी प्रभावी अध्यापक -**

ज्ञानरचनावादी तंत्रामध्ये सुगरणीसारखा शिक्षक म्हणजे आपल्या कार्यावर निष्ठा असणारा, अभिनयकुशल, व्यासंगी, रसिक, कल्पक, उपक्रमशील, विद्यार्थ्यांच्या वयाशी समरस होणारा, विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा थांग शोधणारा, सतत अभ्यासू, गुणग्राहक, मुलांविषयी जिव्हाळा जपणारा, त्यांच्याशी एकरूपता साधणारा, त्यांच्या आकांक्षांशी समरस होणारा, 'अंतरी दुःख गिळूनी आनंद उधळीत जाणारा' असा शिक्षकच प्रसन्नपणे व आनंदाने अध्यापन करू शकेल व अध्यापनातील अध्यापकाची भूमिका तेव्हाच आनंददायी अध्यापन बनवू शकेल.

अध्यापक हा विद्यार्थ्यांना मित्र वाटावा, अधिकारी वाटू नये. प्रामुख्याने त्याने मार्गदर्शकाच्या भूमिकेतच राहावे. 'A poor teacher tells, an ordinary teacher explains, a good teacher demonstrates and a great teacher inspires.' डाल्टन पद्धतीस अनुसरून दिले जाणारे स्वाध्याय आणि वर्ग अध्यापनात चर्चा, वादविवाद, परिसंवाद, चर्चासत्रे, कृतीसत्रे, प्रकल्प यांचे कल्पक संयोजन करून आनंदी वातावरणात शैक्षणिक विकासाचे कार्य घडवून आणणे ही आनंददायी शिक्षणाची गुरुकिल्ली आहे.[६]

**मानसिकतेत बदलाची गरज -**

'नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' नुसार अभ्यासक्रम विकसित करणारे आणि त्यानुसार अध्यापन करणारे या दोघांवर मोठी जबाबदारी आहे. म्हणजे दोहोंनाही सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारावा लागेल. त्यांच्याकडे जिज्ञासूपणा, संशोधक वृत्ती, तर्कशुद्ध विचारसरणी, व्यापक वैज्ञानिक दृष्टिकोन असावा तर लागेलच; पण त्याचबरोबर विश्लेषण, तार्किक विचार आणि संकल्पनात्मक सुस्पष्टता यांची पारख करता येणारी समृद्ध मानसिकता असावी लागेल. तरच भारताच्या संविधानास अभिप्रेत भारतीय समाजाची जडणघडण करण्यात शिक्षक महत्त्वाची भूमिका पार पडू शकेल.[७] २१ व्या शतकातील हे पहिले शिक्षण धोरण असून ३४ वर्षे जुन्या १९८६ च्या शिक्षणावरच्या राष्ट्रीय धोरणाची जागा या धोरणाने घेतली आहे. सर्वांना संधी, नि:पक्षपात, दर्जा, परवडणारे आणि उत्तरदायित्व या स्तंभावर या धोरणाची उभारणी करण्यात आली आहे. २०३० च्या शाश्वत विकास कार्यक्रमाशी याची सांगड घालण्यात आली आहे. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण अधिक समग्र, बहुशाखीय, २१ व्या शतकाच्या गरजांना अनुरूप करीत भारताचे, चैतन्यशील प्रज्ञावंत समाज आणि जागतिक ज्ञान महासत्ता म्हणून परिवर्तन घडवण्याचा आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या विशेष क्षमता पुढे आणण्याचा या धोरणाचा उद्देश आहे.[८]

ज्ञाननिर्मितीकेंद्री अध्यापनास महत्त्व हे ज्ञानसंरचनावादाचे मूळ उद्दिष्ट स्वीकारण्यात आले असल्याने बुद्धीला चालना देणारे वातावरण उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शिक्षणसंस्थांची व शिक्षकांची असल्याची स्पष्ट झाले आहे. याच अनुषंगाने २०१३ पासून प्राथमिक स्तरावर या नव्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाचा वापर करण्यात येऊ लागला; पण आता त्याच्या पुढची पायरी आहे ती म्हणजे कौशल्य विकासाची. विद्यार्थी केवळ ज्ञानसंपन्न असून भागणार नाही. प्राप्त ज्ञानाचा उपयोग जीवन जगण्यासाठी होणं ही वर्तमान शिक्षणाची पूर्व अट होऊन बसली आहे. जागतिकीकरणाच्या रेट्यात कुशल मनुष्यबळाची वाढती मागणी लक्षात घेता विद्यार्थी हा तंत्रकुशल असायला हवा याचे भान देशास झाल्यामुळे शिक्षणात कौशल्य विकासाला असाधारण महत्त्व देण्यात आले आहे.

कार्यक्षम तरुण मनुष्यबळ हा मुद्दा लक्षात घेता नव्या शिक्षण धोरणाच्या सन २०१६ च्या मसुद्यामध्ये शिक्षणाचे व्यावसायिकरण व विद्यार्थ्यांचे कुशल मनुष्यबळात रूपांतर करणे हे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे की, "To enhance emploibility, a blend of education and skill is essential for individual growth and economic development.

Fstering dignity and social acceptibility to high quality vocational training needs increased attention."[९]

**ज्ञानरचनावादाच्या मर्यादा (?)**

ज्ञानरचनावादाबद्दल काही मर्यादा सांगितल्या जातात; पण एक वर्गअध्यापन पद्धती आणि शिकण्याची नैसर्गिक पद्धती म्हणून ज्ञानरचनावादाकडे पाहिल्यास ती एक प्रभावी आणि परिणामकारक शिक्षण प्रक्रिया आहे असेच दिसून येते. शिवाय मर्यादांवर प्रभावी उपाययोजनाही करता येऊ शकते.

१) घरात शिक्षण समृद्ध वातावरण लाभलेल्या विद्यार्थ्यांनाच याचा फायदा होतो असा एक विचार सांगितला जातो. तथापि यामुळे जरी वेगवेगळ्या विद्यार्थ्यांच्या अनुभवात तफावत येत असली तरी गटचर्चेतून सम्यक अनुभवाची निर्मिती होऊ शकते. इतर मुलांशी होणाऱ्या सामाजिक आंतरक्रियेतून मुलांना व्यक्तिगत विकासात फायदा होतो. गटात समस्या सोडवत असताना एकमेकांच्या मदतीने उत्तर शोधण्याच्या अंतिम टप्प्यावर एक अवकाश (Zone of Proximal development) निर्माण होतो.

२) परस्परांतील चर्चेत ज्यांच्या विचारांचे प्राधान्य राहील त्यांचाच वरचष्मा राहील व नरम प्रवृत्तीच्या विद्यार्थ्यांना नमते घ्यावे लागेल असे म्हटले जाते.

पण निरीक्षणातून अध्यापकास जेव्हा तसे दिसून येईल तेव्हा त्या विद्यार्थ्यांना अध्यापक योग्यरीतीने बोलण्यास प्रोत्साहित करेल व अभिव्यक्तीसाठी प्रवृत्त करेल.

३) एका इयत्तेसाठी एका विषयाचे एकच पाठ्यपुस्तक हे अभ्यासक्रमाचे प्रचलित साधन आहे. तर ज्ञानरचनावाद अनेक पाठ्यपुस्तकांचा वापर सुचवितो. असे असले तरी ज्ञानरचनावादी अध्यापनात विद्यार्थ्यांनी अनुभवातून काढलेल्या निष्कर्षांमध्ये शिक्षक स्वतः भर घालतो. अशा वेळी पाठ्यांशाच्याबाबतीत शिक्षक विविध पुस्तकांतील संदर्भ देऊन ही उणीव भरून काढू शकतो. अध्यापनाच्या पूर्वतयारीमध्ये शिक्षकाने या गोष्टीचा विचार करून संदर्भ मिळविणे अपेक्षित आहेच.

४) वर्गातील मोठी विद्यार्थ्यांची संख्या ही ज्ञानरचनावादी अध्यापनात अडथळा ठरू शकते अशी शंका काही शिक्षकांकडून व्यक्त होताना दिसते. एक तर अशा मोठ्या वर्गात वर्ग नियंत्रणास आव्हान असते. व्याख्यान पद्धतीने मुलांचे अवधान केंद्रित राहणे कठिण असते. मुले शिक्षकाकडे पाहत असली तरी सर्वांचेच अवधान अध्ययनकेंद्रित असेलच असे सांगता येत नाही. तो चटकन लक्षात येईलच असे नाही. पण ज्ञानरचनावादी अध्ययनात प्रत्येक विद्यार्थी विचारप्रवृत्त झालेला असतो. ती त्याची गरज असते. ती त्याची स्वयंप्रेरणा असते. गटांचे निरीक्षण करताना अपवादात्मक विद्यार्थी चटकन लक्षात येतो. त्यामुळे त्याला सहभाग घेण्यास, विचारप्रवृत्त होण्यास प्रोत्साहन देता येते. Learning by doing अशी ही अध्ययनप्रक्रिया असल्याने अवधान विचलित होण्याचा प्रश्नच येत नाही. इथे त्याला अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असते, की जे त्याला हवे असते.[१०]

**आव्हाने** -

अजूनही रचनावाद म्हणजे शाळेत साहित्य, साधने वाढवणे, जमिनी शैक्षणिक बाबींनी रंगवणे; तसेच भिंतीवर चित्रे, मुलांच्या कामासाठीची जागा वाढवणे इतक्याच मर्यादित अर्थाने सार्वत्रिक पातळीवर घेतला जातो. खरे तर रचनावाद ही मुलांची शिकण्याची नैसर्गिक पद्धत म्हणून सार्वत्रिक मान्यता पावलेली पद्धत आहे.

रचनावादी पद्धतीमध्ये महत्त्व हे शिकवण्याला नसून, शिकण्याला आहे. त्यामुळे आपल्याला आपल्या भाषेपासून बदल करावा लागेल. 'आम्ही रचनावादी पद्धतीने शिकवतो' असे म्हणण्यापेक्षा 'आमच्या शाळेत मुले रचनावादी पद्धतीने शिकतात' आणि शिक्षक म्हणून आम्ही काय करतो, तर मुलांना रचनावादी पद्धतीने शिकण्यासाठी मदत करतो, अशी भूमिका शिक्षकांची असावी लागेल. त्यामुळे पारंपरिक शिकवण्याच्या पद्धतीला छेद देऊन मुलांसाठी शिकण्याला पूरक वातावरण निर्माण करावे लागणार आहे. मुले अनेक गोष्टी करून पाहतात, स्वतः अनुभव घेतात. हे सारे अनुभव केवळ शाळेच्या चार भिंतींमध्ये व शाळेच्या परिसरात उभे करणे अशक्य आहे. त्यामुळे शिक्षण हे शाळेबाहेरील परिसरात आणि समाजात घेऊन जावे लागणार आहे. मूल जिथे शिकू शकेल, त्या बाबी शाळेशी जोडाव्या लागतील. हे करण्यासाठी पाठ्यपुस्तकांवर आधारित शिक्षण करण्यापेक्षा कौशल्य विकसन आणि संकल्पना स्पष्टीकरण यांचा विचार करावा लागेल आणि हे मुले ज्या परिसरात वावरतात, तेथील त्यांच्या अनुभवांशी जोडत जावे लागेल. रचनावादाचा अजून एक महत्त्वाचा पैलू आहे, तो म्हणजे प्रत्येक मुलाचा व्यक्तिगत विचार. याचे कारण प्रत्येक मूल स्वतंत्र असते, त्याची शिकण्याची पद्धत, कृती करण्याचा वेळ वेगवेगळा असतो, असे रचनावाद मानतो. त्यामुळे प्रत्येकाला त्याच्या गरजांनुसार संधी मिळणे आणि त्याच्या गरजेनुसार शिक्षण मिळणे आवश्यक आहे.

प्रशासनाकडूनही आवश्यक त्या सुधारणा व मदत करणारी धोरणे आखली जावीत, यासाठी सक्षम तयारी करावी लागणार आहे. शिक्षकांना प्रयोग करायला प्रोत्साहन मिळणे, त्यासाठी आवश्यक बदल करणे, चुका करायची व त्या सुधारायची संधी मिळणे हे

व्हावे लागेल. त्यातून येत्या काळात शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होऊ शकतील.[११]

**नव्या शिक्षणाचा नवा मंत्र**

बदलत्या काळानुसार शिक्षकाची भूमिका बदलेल तरच तो एकविसाव्या शतकाची आव्हाने पेलू शकेल म्हणून जगभर नव्या शिक्षकाची नवी भूमिका, क्षमता, अपेक्षांबाबत वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे ती स्वीकारायला आव्हानात्मक आहे. आतापर्यंत शिक्षक विद्यार्थ्याला जग दाखवायचा, त्याचे डोळे उघडायचा, त्याला दृष्टी द्यायचा. आता शिक्षकाने विद्यार्थ्यांच्या नजरेतून जग पाहण्याची, समजून घेण्याची गरज आहे. नव्या शिक्षण पद्धतीत विद्यार्थ्यांच्या जिज्ञासापूर्तीस असाधारण महत्त्व असल्याने विद्यार्थ्यांनी शिक्षकाला किंवा शिक्षकांवर प्रश्नांचा भडीमार करणे अपेक्षित आहे. शिक्षकांनी ज्ञान देण्यापेक्षा ज्ञान संपादनात, संपादनाचं कौशल्य विद्यार्थ्यांत निर्माण करणे अपेक्षित राहणार आहे.[१२]

**निष्कर्ष** -

१) ज्ञानरचनावादामुळे शिक्षण अधिक प्रभावी आणि अर्थपूर्ण होते.
२) ज्ञानरचनावाद जबाबदार आणि चांगले नागरिक घडविणाऱ्या शिक्षणाला प्रोत्साहन देतो.
३) रचनावादी शिक्षणपद्धती हा केवळ आधीच्या वर्तनवादी शिक्षणपद्धतीला पर्याय आहे असे नाही तर पूर्वीच्या शिक्षणातल्या अडचणी दूर करून नवी अधिक फलदायक, विद्यार्थ्यांना अधिक लाभकारक, विद्यार्थ्यांना (व त्यांच्या समवेत काम करणाऱ्या शिक्षक- शिक्षिकांना) आनंद मिळवून देणारी आणि मुख्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या अंगाने शिकण्या- शिकविण्याचा विचार करणारी अशी ही पर्यायी शिक्षणप्रणाली आहे.
४) आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ज्ञानरचनावादी शिक्षण अधिक प्रभावी करता येते आणि विद्यार्थ्यांना डिजिटल युगासाठी तयार करता येते.
५) विद्यार्थ्यांना भविष्यातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक कौशल्ये ज्ञानरचनावादी शिक्षणातून प्राप्त होतात.

**■ संदर्भ सूची**

**१)** नीतूदेवी पंडित बावडेकर, 'बदलत्या शिक्षणाची आव्हाने', दै. सकाळ लेख, दि. २० मार्च २०२३
**२)** मिनाक्षी राऊत, 'ज्ञानरचनावाद : प्रभावी अध्ययन व अध्यापनाचा मार्ग', Scholarly Research Journal for Humanity Science & English Language, Peer Reviewed journal, पृष्ठ क्र. १०६५८
३) https://rameshpanse.mkcl.org
४) marathivishwakosh.org, 'ज्ञानरचनावाद'
५) राजेंद्रकुमार गोंधळी, 'शिकण्यासाठी शिकविणे', अक्षर दालन प्रकाशन कोल्हापूर, पृष्ठ क्र. २९,३०
६) कित्ता, पृष्ठ क्र. ३८
७) प्रा. डॉ. भालबा विभुते, 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० - चिकित्सा', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, पृष्ठ क्र. १०७, १०८
८) कित्ता, पृष्ठ क्र. १०९
९) डॉ. सुनीलकुमार लवटे, 'नवे शिक्षण, नवे शिक्षक', अक्षर दालन प्रकाशन कोल्हापूर, तिसरी आवृत्ती फेब्रुवारी २०१८, पृष्ठ क्र. १३२, १३३
१०) राजेंद्रकुमार गोंधळी, 'शिकण्यासाठी शिकविणे', अक्षर दालन प्रकाशन कोल्हापूर, पृष्ठ क्र. २७,२८
११) प्रसाद मणेरीकर, 'ज्ञानरचनावाद प्रभावी करूया', संपादकीय लेख, दै. सकाळ, दि. १५ मे २०१९
१२) डॉ. सुनीलकुमार लवटे, 'नवे शिक्षण, नवे शिक्षक', अक्षर दालन प्रकाशन कोल्हापूर, तिसरी आवृत्ती फेब्रुवारी २०१८, पृष्ठ क्र. १४९,१५०